जा.क्र.कबचौउमवि/१६/ईमेल/२०२४ दिनांक :- २९ जानेवारी २०२४

---

जळगाव दि. २९ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने प्रशाळांमधील संशोधन वाढीला लागावे यासाठी समाजातील सेवाभावी संस्था आणि दानशूर व्यक्तींना फेलोशिपकरीता प्रायोजक म्हणून मदतीच्या केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत जळगावच्या सुहान्स केमिकल्स प्रा.लि. ने सीएसआर फंड अंतर्गत तीन फेलोशिप प्रायोजित करण्यासाठी ८ लाख ५० हजार रुपये विद्यापीठाला दिले आहेत.

संशोधनासाठी शासनाच्या विविध वित्तीय संस्थांकडून निधी प्राप्त होण्याचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या संकल्पनेतून संशोधन प्रोत्साहन योजना (प्रमोट) आकाराला आली आहे. या योजनेत समाजातील दानशूर व्यक्ती अथवा सेवाभावी संस्था यांना फेलोशिपचे प्रायोजकत्व घेण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे. जळगाव येथील सुहान्स केमिकल्स प्रा.लि. चे संचालक संदीप काबरा, तसेच सतना काबरा यांनी या आवाहनाला प्रतिसाद देत रसायनशास्त्र विषयातील संशोधनासाठी डॉ. किशन काबरा फेलोशिप २ विद्यार्थ्यांसाठी सुरु केली आहे तर पर्यावरणशास्त्र विषयातील संशोधनासाठी १ फेलोशिप सुरु केली आहे. या एकुण तीन फेलोशिपसाठ ८ लाख ५० हजार रुपयांचा निधी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे. या कंपनीच्या सीएसआर फंडातून हा निधी देण्यात आला आहे. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील तसेच डॉ.भूषण चौधरी, डॉ. राजेश जवळेकर, डॉ.विकास गिते उपस्थित होते.

## बातमी क्र.२

जळगाव दि. २९ (प्रतिनिधी) कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून घेण्यात आलेल्या महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेचा संघ जिल्हास्तरावर विजेता ठरला असून त्यांना एक लाख रुपयांचे बीज भांडवल व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

हा संघ राज्यस्तरावर होणाऱ्या पुढील फेरीसाठी पात्र ठरला आहे. पायस सावळे आणि प्रणित मराठे या दोन विद्यार्थ्यांचा संघात समावेश होता. प्रा.राज आमले यांनी संघाला मार्गदर्शन केले तर प्रा.अजय सुरवाडे यांनी स्पर्धेची तयारी करुन घेतली. या दोन विद्यार्थ्यांनी विद्यार्थी व शिक्षक यांच्या कामगिरींचे मूल्यमापन करण्यासाठी ॲप तयार करण्याची कल्पना या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत

…… ……

मांडली असून त्यासाठी त्यांना एक लाख रुपयांचे बीज भांडवल दिले जाणार आहे. कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी व प्रशाळेचे संचालक प्रा. एस.आर.कोल्हे यांनी संघाचे अभिनंदन केले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी